Teachingninja.in

Latest Govt Job updates

Private Job updates

Free Mock tests available

Visit - teachingninja.in

# MPSC
# SWO
## Previous Year Paper
## 2009

Teachingninja.in

# A

CODE : GLL

प्रश्नपुस्तिका क्रमांक
BOOKLET NO. 106989

प्रश्नपुस्तिका

चाळणी परीक्षा/SCREENING TEST

वेळ : दीड तास

एकूण प्रश्न : 150

एकूण गुण : 150

## सूचना

(1) सदर प्रश्नपुस्तिकेत 150 अनिवार्य प्रश्न आहेत. उमेदवारांनी प्रश्नांची उत्तरे लिहिण्यास सुरुवात करण्यापूर्वी या प्रश्नपुस्तिकेत सर्व प्रश्न आहेत किंवा नाहीत याची खात्री करून घ्यावी. असा तसेच अन्य काही दोष आढळल्यास ही प्रश्नपुस्तिका समवेक्षकांकडून लगेच बदलून घ्यावी.

(2) आपला परीक्षा क्रमांक ह्या चौकोनांत **न विसरता बॉलपेनने** लिहावा.

परीक्षा-क्रमांक

केंद्राची संकेताक्षरे

शेवटचा अंक

(3) वर छापलेला प्रश्नपुस्तिका क्रमांक तुमच्या उत्तरपत्रिकेवर विशिष्ट जागी उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे **न विसरता नमूद करावा.**

(4) या प्रश्नपुस्तिकेतील प्रत्येक प्रश्नाला 4 पर्यायी उत्तरे सुचविली असून त्यांना 1, 2, 3 आणि 4 असे क्रमांक दिलेले आहेत. त्या चार उत्तरांपैकी सर्वात योग्य उत्तराचा क्रमांक उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे तुमच्या उत्तरपत्रिकेवर नमूद करावा.- अशा प्रकारे उत्तरपत्रिकेवर उत्तरक्रमांक नमूद करताना तो संबंधित प्रश्नक्रमांकासमोर छायांकित करून दर्शविला जाईल याची काळजी घ्यावी, **ह्याकरिता फक्त काळ्या शाईचें बॉलपेन वापरावे, पेन्सिल वा शाईचे पेन वापरू नये.**

(5) सर्व प्रश्नांना समान गुण आहेत. यास्तव सर्व प्रश्नांची उत्तरे द्यावीत. घाईमुळे चुका होणार नाहीत याची दक्षता घेऊनच शक्य तितक्या वेगाने प्रश्न सोडवावेत. क्रमाने प्रश्न सोडविणे श्रेयस्कर आहे पण ***एखादा प्रश्न कठीण वाटल्यास त्यावर वेळ न घालविता पुढील प्रश्नाकडे वळावे.*** अशा प्रकारे शेवटच्या प्रश्नापर्यंत पोहोचल्यानंतर वेळ शिल्लक राहिल्यास कठीण म्हणून वगळलेल्या प्रश्नांकडे परतणे सोईस्कर ठरेल.

(6) उत्तरपत्रिकेत एकदा नमूद केलेले उत्तर खोडता येणार नाही. नमूद केलेले उत्तर खोडून नव्याने उत्तर दिल्यास ते तपासले जाणार नाही.

(7) **प्रस्तुत परीक्षेच्या उत्तरपत्रिकांचे मूल्यांकन करताना उमेदवाराच्या उत्तरपत्रिकेतील योग्य उत्तरांनाच गुण दिले जातील. तसेच "उमेदवाराने वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरूपाच्या प्रश्नांची अचूक उत्तरेच उत्तरपत्रिकेत नमूद करावीत. अन्यथा त्यांच्या उत्तरपत्रिकेत सोडविलेल्या प्रत्येक चार चुकीच्या उत्तरांसाठी एका प्रश्नाचे गुण वजा करण्यात येतील".**

(8) प्रश्नपुस्तिकेमध्ये विहित केलेल्या विशिष्ट जागीच कच्चे काम (रफ वर्क) करावे. प्रश्नपुस्तिकेव्यतिरिक्त उत्तरपत्रिकेवर वा इतर कागदावर कच्चे काम केल्यास ते कॉपी करण्याच्या उद्देशाने केले आहे, असे मानले जाईल व त्यानुसार उमेदवारावर शासनाने जारी केलेल्या "परीक्षांमध्ये होणाऱ्या गैरप्रकारांना प्रतिबंध करण्याबाबतचे अधिनियम-82" यातील तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती कमाल एका वर्षाच्या कारावासाच्या आणि/किंवा रुपये एक हजार रकमेच्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल.

(9) -------------------------------------------------------------------------------------------> (कृपया पान उलटवा)

## ताकीद

**ह्या प्रश्नपत्रिकेसाठी आयोगाने विहित केलेली वेळ संपेपर्यंत ही प्रश्नपुस्तिका आयोगाची मालमत्ता असून ती परीक्षाकक्षात उमेदवाराला परीक्षेसाठी वापरण्यास देण्यात येत आहे. ही वेळ संपेपर्यंत सदर प्रश्नपुस्तिकेची प्रत/प्रती, किंवा सदर प्रश्नपुस्तिकेतील काही आशय कोणत्याही स्वरूपात प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे कोणत्याही व्यक्तीस पुरविणे, तसेच प्रसिद्ध करणे हा गुन्हा असून अशी कृती करणाऱ्या व्यक्तीवर शासनाने जारी केलेल्या "परीक्षांमध्ये होणाऱ्या गैरप्रकारांना प्रतिबंध करण्याबाबतचा अधिनियम-82" यातील तरतुदीनुसार तसेच प्रचलित कायद्याच्या तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती कमाल एक वर्षाच्या कारावासाच्या आणि/किंवा रुपये एक हजार रकमेच्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल.**

**तसेच ह्या प्रश्नपत्रिकेसाठी विहित केलेली वेळ संपण्याआधी ही प्रश्नपुस्तिका अनधिकृतपणे बाळगणे हा सुद्धा गुन्हा असून तसे करणारी व्यक्ती आयोगाच्या कर्मचारीवृंदापैकी, तसेच परीक्षेच्या पर्यवेक्षकीयवृंदापैकी असली तरीही अशा व्यक्तीविरुद्ध उक्त अधिनियमानुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती शिक्षेस पात्र होईल.**

Teachingninja.in

A

Teachingninja.in

(9) सदर प्रश्नपत्रिकेसाठी आयोगाने विहित केलेली वेळ संपल्यानंतर उमेदवाराला ही प्रश्नपुस्तिका स्वत: बरोबर परीक्षाकक्षाबाहेर घेऊन जाण्यास परवानगी आहे. मात्र परीक्षाकक्षाबाहेर जाण्यापूर्वी उमेदवाराने आपल्या उत्तरपत्रिकेचा भाग – 1 समवेक्षकाकडे न विसरता परत करणे आवश्यक आहे.

---

## नमुना प्रश्न

प्रश्न.क्र. 201. आधुनिक विचारसरणीनुसार शिक्षणाच्या प्रक्रियेतील केंद्रबिंदु कोण ?

(1) शिक्षण संस्था (2) शिक्षक

(3) विद्यार्थी (4) अभ्यासक्रम

ह्या प्रश्नाचे योग्य उत्तर "(3) विद्यार्थी" असे आहे. त्यामुळे या प्रश्नाचे उत्तर "(3)" होईल. यास्तव खालीलप्रमाणे प्र.क्र. 201 समोरील उत्तर-क्रमांक "③" हे कंस पूर्णपणे छायांकित करून दाखविणे आवश्यक आहे.

प्र.क्र. 201. ① ② ● ④

अशा पद्धतीने प्रस्तुत प्रश्नपुस्तिकेतील प्रत्येक प्रश्नाचा तुमचा उत्तरक्रमांक हा तुम्हाला स्वतंत्ररीत्या पुरविलेल्या उत्तरपत्रिकेवरील त्या त्या प्रश्नक्रमांकासमोरील संबंधित वर्तुळ पूर्णपणे छायांकित करून दाखवावा. **ह्याकरिता फक्त काळ्या शाईचे बॉलपेन वापरावे. पेन्सिल वा शाईचे पेन वापरू नये.**

---

**पर्यवेक्षकांच्या सूचनेविना हे पृष्ठ उलटू नये**

---



Teachingninja.in
Teachingninja.in

कच्च्या कामासाठी जागा/SPACE FOR ROUGH WORK



Teachingninja.in

1. समांजकार्यातील स्वयंनिर्णयाचे तत्त्व म्हणजे ________________

(1) समाज कार्यकर्त्याने स्वत: निर्णय घेणे (2) समस्याग्रस्त व्यक्तीने निर्णय घेणे

(3) समाजातील पुढाऱ्यांनी निर्णय घेणे (4) सरकारी अधिकाऱ्यांनी निर्णय घेणे

---

2. एच्. स्पेन्सर यांचा 'ग्रेटर हॅपीनेस' संकल्पनेनुसार ________________

(1) व्यक्तीची इच्छा नेहमी जास्त सुख मिळविण्याची असते

(2) व्यक्तीची इच्छा नेहमी जास्त फायदा मिळविण्याची असते

(3) व्यक्तीची इच्छा नेहमी जास्त जबाबदारी घेण्याची असते

(4) व्यक्तीची इच्छा नेहमी जबाबदारीतून मुक्त होण्याची असते

---

3. समुदाय संघटन हे ________________ आहे ________________ नव्हे.

(1) काम – हौस (2) साधन – साध्य

(3) साध्य – साधन (4) विकास – संघटन

---

4. समाजकार्य समस्या सोडविण्यास ________________ पुरवते.

(1) शास्त्रशुद्ध मार्ग व साधने (2) पैसा व माणसे

(3) सल्ला व मार्गदर्शन (4) विचार

---

5. राजा राममोहन रॉय यांनी केलेल्या जनजागृतीमुळेच ________________ यांनी 1829 साली सतीची चाल बंद करण्यासंबंधीचा कायदा संमत केला.

(1) लॉर्ड डलहौसी (2) लॉर्ड रिपन

(3) लॉर्ड माऊंटबॅटन (4) लॉर्ड बेंटिंक

---

6. समाजकार्याचा मुख्य उद्देश म्हणजे व्यक्तीला ________________ बनविणे.

(1) परावलंबी (2) स्वावलंबी (3) हुशार (4) चलाख

---

7. समाजकार्याच्या तत्त्वानुसार समस्या असलेली व्यक्ती कलंकित ________________

(1) मानली जाते (2) मानली जात नाही

(3) केली जाते (4) होत असते

---

SPACE FOR ROUGH WORK



Teachingninja.in

8. भारतामध्ये खालीलपैकी कशाची मोठी परंपरा आहे ?

(1) समाजसेवेची (2) व्यावसायिक समाजकार्याची

(3) समाजकल्याण प्रशासनाची (4) कामगार कल्याणाची

9. व्यावसायिक समाजकार्याच्या किती पद्धती आहेत ?

(1) 4 (2) 5 (3) 6 (4) 7

10. देशाच्या स्वातंत्र्यासाठी फासावर गेलेल्या शहिद भगतसिंहानी कोणत्या संघटनेत राहून सामाजिक व स्वातंत्र्याच्या चळवळीत भागीदारी केली ?

(1) भारतीय क्रांती सेना

(2) नौजवान क्रांतीकारक संघटना

(3) हिंदुस्थान सोशॅलिस्ट रिपब्लीक असोसिएशन (एच. एस. आर. ए.)

(4) भारत नौजवान संघटन

11. वि. रा. शिंदे यांनी मुंबईला डिप्रेसड् क्लासेस मिशन सोसायटीमार्फत ______________ शिक्षणाची सोय केली.

(1) स्त्रियांच्या (2) मुलांच्या (3) दलितांच्या (4) हिंदुंच्या

12. ब्रिटीशांच्या पाश्चात्य शिक्षण प्रसारामुळे सर्व प्रथम ________________ प्रांतामध्ये समाज सुधारणेची चळवळ सुरु झाली.

(1) मद्रास (2) मुंबई (3) बंगाल (4) केरळ

13. महाराष्ट्रात समाजकार्याचे प्रशिक्षण देणारी पहिली संस्था कोणती ?

(1) कर्वे इन्स्टीट्यूट ऑफ सोशल सर्विस, पुणे (2) मातृसेवा संघ इन्स्टीट्यूट ऑफ सोशल सायन्स, नागपुर

(3) टाटा सामाजिक विज्ञान संस्था, मुंबई (4) समाजकार्य महाविद्यालय, औरंगाबाद

14. गुन्ह्या संदर्भात बर्ट यांनी 1925 साली ________________ सिद्धान्त मांडला.

(1) समाजशास्त्रीय (2) जैवकीय (3) सोशॅलिस्ट (4) बहुकारकवादी

15. भारतात खुले कारागृहाचा पहिला प्रयोग ________________ साली करण्यात आला.

(1) 1933 (2) 1955 (3) 1956 (4) 1960

SPACE FOR ROUGH WORK



Teachingninja.in

16. वेश्या व्यवसाय करणाऱ्या स्त्रियांसाठी सद्या नवीन संज्ञा प्रचलित होत आहे

(1) देहव्यापार पीडित (2) देहव्यापार शोषित

(3) देहविक्री करणारी महिला (4) देहव्यापार करणारी स्त्री

---

17. मादक पदार्थाचे सेवन केल्यामुळे ______________ येते त्यामुळे थोडावेळ वेगळ्या प्रकारचा आनंद मिळतो.

(1) तरतरी (2) हुशारी (3) तजेली (4) गुंगी

---

18. कारखाना कायदा 1948 कलम 67 नुसार ______________ वर्षाखालील मुलांना कारखान्यात कामावर ठेवण्यास मनाई केली आहे.

(1) 16 (2) 12 (3) 14 (4) 18

---

19. सामाजिक विघटनामुळे ______________ उद्भवतात.

(1) सामाजिक अन्याय (2) सामाजिक समता

(3) सामाजिक समस्या (4) सामाजिक शांतता

---

20. एका बाजूला श्रीमंती व पैसा तर दुसरीकडे दारिद्र्य व उपासमार यालाच ______________ म्हणतात.

(1) गरिबी (2) समाज (3) समुदाय (4) विषमता

---

21. बालमजूरीच्या उच्चाटनासाठी हे पहिले पाऊल आहे

(1) सक्तीचे व मोफत प्राथमिक शिक्षण देऊन शिक्षणाचे सार्वत्रिकरण करणे

(2) बालमजूरी प्रतिबंध व नियमन कायद्यामध्ये दुरुस्ती करणे

(3) बालकांकडून मजूरी करून घेणाऱ्यास कडक शिक्षा करणे

(4) पालकांनीच त्यांना प्रतिबंध करणे

---

22. ''गुलामाला गुलामगिरीची जाणीव करून दिल्याशिवाय तो पेटून उठणार नाही'' असे कोणी सांगितले ?

(1) डॉ. बाबासाहेब आंबेडकर (2) क्रांतीसिंह कॉ. नाना पाटील

(3) साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे (4) महात्मा ज्योतिराव फुले

---

SPACE FOR ROUGH WORK



Teachingninja.in

23. वर्षानुवर्षे ज्यांना सामाजिक विषमतेचे चटके बसले त्यांच्या उत्थानासाठी 'विशेष' कांही करणे म्हणजे भेदभाव करणे किंवा इतराना भेदभावपूर्वक वागणूक देणे नव्हे. हा ______________ भेदभाव असतो.

(1) सकारात्मक भेदभाव
(2) नकारात्मक भेदभाव
(3) अनावश्यक भेदभाव
(4) अन्याय करणारा भेदभाव

24. भारतात अनुसूचित जातीच्या लोकसंख्येची सर्वात जास्त टक्केवारी कोणत्या राज्यात आहे ?

(1) उत्तरप्रदेश (2) बिहार (3) महाराष्ट्र (4) पंजाब

25. जगभरातील कुपोषित व्यक्तींची संख्या 2007 सालच्या 923 मिलीयन वरून 2008 साली ______________ मिलीयनपर्यंत पोहचली आहे.

(1) 963 मिलीयन
(2) 1063 मिलीयन
(3) 1163 मिलीयन
(4) 1263 मिलीयन

26. खाजगीकरण, उदारीकरण व जागतिकीकरणाच्या प्रक्रियेमुळे ______________

(1) संघटित क्षेत्रातील कामगार-कर्मचाऱ्यांची संख्या वाढली आहे
(2) असंघटित क्षेत्रातील कामगार-कर्मचाऱ्यांची संख्या वाढली आहे
(3) तंत्रज्ञानामुळे जास्त लोकांना रोजगार उपलब्ध झाला आहे
(4) वरीलपैकी एकही नाही

27. समाजशास्त्राचे आद्यजनक कोण ?

(1) एमिल डरखाईम (2) हर्बर्ट स्पेन्सर (3) मॅक्स वेबर (4) ऑगस्ट काम्ट

28. कुटुंब ही सामाजिक संस्था असून निश्चित मानवी गरजा भागविण्याच्या उद्देशाने तिची निर्मिती झाली आहे ही व्याख्या कोणाची ?

(1) डी. एन्. मुजमदार
(2) बील्स अॅन्ड होईझार
(3) मॅकआयव्हर व पेज
(4) इलियट व मेरिल

29. भारताची आर्थिक राजधानी कोणती ?

(1) दिल्ली (2) चेन्नई (3) मुंबई (4) हैद्राबाद

SPACE FOR ROUGH WORK



Teachingninja.in

30. भारतात खाजगीकरण, उदारीकरण व जागतिकीकरणाची प्रक्रिया कोणत्या पंतप्रधान व अर्थमंत्र्याच्या काळात प्रारंभ झाली ?

(1) पंतप्रधान राजीव गांधी व अर्थमंत्री व्ही. पी. सिंग

(2) पंतप्रधान नरसिंहराव व अर्थमंत्री मनमोहन सिंग

(3) पंतप्रधान आय.के.गुजराल व अर्थमंत्री पी. चिदंबरम

(4) पंतप्रधान मनमोहन सिंग व अर्थमंत्री पी. चिदंबरम

31. जगातून पिळवणूकीचा अंत होण्यासाठी उत्पादनाच्या साधनांवरील खाजगी मालकी नष्ट होणे आवश्यक असल्याचा सिद्धांत कोणी मांडला ?

(1) अल्बर्ट आइनस्टाईन (2) मॅक्स वेबर (3) कार्ल मार्क्स (4) गौतम बुद्ध

32. समाजकार्य पद्धतीचा अवलंब समाजशास्त्राच्या मदतीशिवाय शक्य नाही कारण ______________

(1) व्यक्तीच्या समस्येची मूळे स्पष्ट होतात (2) व्यक्तीच्या सामाजिकतेला आधार मिळतो

(3) व्यक्ती वाईट प्रवृत्तीपासून दूर होते (4) व्यक्तीस सन्मानाने जगता येते

33. समाजकार्य या आधुनिक शास्त्राची निर्मिती कोणत्या दोन शास्त्रातून झाली आहे ?

(1) समाजशास्त्र व राज्यशास्त्र (2) समाजशास्त्र व अर्थशास्त्र

(3) समाजशास्त्र व मानसशास्त्र (4) समाजशास्त्र व गृहअर्थशास्त्र

34. समाजशास्त्र या सामाजिक विज्ञानात खालीलपैकी कोणत्या घटकाचे अध्ययन केले जाते ?

(1) समूहातील आंतरक्रिया (2) सामाजिक संस्थामधील आंतरसंबंध

(3) विकास तसेच परिवर्तनाची प्रक्रिया (4) वरील सर्व

35. प्राथमिक गटातील सदस्यामध्ये संबंध

(1) वरवरचे असतात (2) जिव्हाळ्याचे व अनौपचारिक असतात

(3) औपचारिक स्वरूपाचे असतात (4) कृत्रिम स्वरूपाचे असतात

36. गर्भधारणेपासून जन्मापर्यंत असलेली अवस्था अंदाजे ____________ दिवसाची असते.

(1) 200 ते 225 (2) 270 ते 280

(3) 300 ते 310 (4) 225 ते 240

SPACE FOR ROUGH WORK



Teachingninja.in

37. अनुवंशिक गुणधर्म हे ____________ वेळी एकदाच व कायमचे निश्चित होतात.

(1) जन्माचे वेळी
(2) जन्मानंतर
(3) गर्भधारणेच्या वेळी
(4) गर्भधारणेनंतर

38. रँक यांच्यामते व्यक्तिमत्त्व विकास म्हणजे काय ?

(1) व्यक्ती विकास प्रक्रिया
(2) व्यक्तीचा सामाजिक व आर्थिक विकास
(3) व्यक्तीचा शारीरिक विकास
(4) स्वजागृती व स्वजाणीवेची प्रक्रिया

39. मानसशास्त्रज्ञ 'रोर्शाचे' शाई निर्मित डाग कुठल्या चाचणीशी संबधित आहे ?

(1) मानवी प्रेरणा संघर्ष
(2) व्यक्तिमत्त्व
(3) वर्जन – वर्जन संघर्ष
(4) बुद्धिमत्ता

40. मानवी व्यक्तिमत्त्व मापनाच्या कोणत्या पद्धति होय ?

(1) संस्कृति व समाज पद्धति
(2) कुटुंब, शेजार व शाळा पद्धति
(3) मुलाखत, पदनिश्चय व प्रश्नावलि पद्धति
(4) शरीरयष्टी व अंत:स्त्राव ग्रंथि पद्धति

41. मनोविश्लेषणवादी कार्ल युंग याने वर्तनावर आधारित व्यक्तिमत्त्वाचे खालीलप्रमाणे कोणते प्रकार सांगितले आहेत ?

(1) मेदोदेहिता, स्नायुप्रधान देहिता, अस्थिप्रधान देहिता
(2) अंतर्मुख, बहिर्मुख
(3) हट्टी, परावलंबी
(4) भित्री, चिडखोर

42. फ्राईडच्या मते व्यक्तिमत्त्वाचे खालीलपैकी तीन घटक कोणते ?

(1) मेंदू , शरीर, मन
(2) शरीर, वातावरण , कुटुंब
(3) शाळा, कुटुंब, मित्र
(4) इदम्, अहम्, पराहम्

43. उत्तर बाल्यावस्थेचा वयोगट सर्वसाधारणपणे कोणता असतो ?

(1) 13 ते 16 वर्ष
(2) 10 ते 15 वर्ष
(3) 01 ते 05 वर्ष
(4) 06 ते 12 वर्ष

**SPACE FOR ROUGH WORK**



Teachingninja.in

44. पुढील अवस्थांपैकी कोणती अवस्था विकृत व्यक्तिमत्त्वाची आहे ?

(1) वार्धक्यजन्य मनोदुर्बलता (2) विषण्णमनस्कता

(3) मद्यातिरेक जन्म विकृति (4) अपस्मारातील मनोविकृति

---

45. मानसिक विकृतीच्या उपचार पद्धतींपैकी आंतरव्यक्ती उपचार पद्धतीत खालीलपैकी कोणत्या उपचार पद्धतीचा समावेश होतो ?

(1) कुटुंब उपचार पद्धति (2) क्लाएंट सेंटर्ड थेरपी

(3) गेस्टाल्ट (4) क्रायसिस थेरपी

---

46. ओरल, ॲनल, लॅटन्सी, फॅलिक व जेनिटल ही विकासाच्या अवस्थांची नावे देणारा शास्त्रज्ञ कोण ?

(1) थॉर्नडाईक (2) पेज (3) फ्राईड (4) ॲडलर

---

47. मानसशास्त्र व्यक्ती व तिचे वर्णन समजून घेते तर समाजकार्य

(खालीलपैकी योग्य पर्याय निवडून वाक्य पूर्ण करा)

(1) व्यक्तीला मदत करते

(2) वागणूक अभ्यासते

(3) मानवी वर्तनाच्या मनो-सामाजिक बाजूच्या संदर्भात काम करते

(4) सल्ला देते

---

48. व्यक्तीची बुद्धिमत्ता, जाणीवावस्था व शारीरिक क्रियावर नियंत्रण ठेवण्याची क्षमता यामध्ये आत्यंतिक बिघाड होणारा आल्झायमर हा रोग कोणत्या अवस्थेत होतो ?

(1) बाल्यावस्था (2) कुमारावस्था (3) प्रौढावस्था (4) वृद्धावस्था

---

49. राष्ट्रीय सामाजिक मदत कार्यक्रम (एन.एस.ए.पी.) विस्तारीत करून त्यात ______________ या योजनेचा समावेश करण्याचे केंद्र सरकारने ठरवले आहे.

(1) इंदिरा गांधी राष्ट्रीय विधवा पेन्शन योजना (2) प्रियदर्शिनी विधवा पेन्शन योजना

(3) कर्मचारी भविष्य निर्वाह निधी योजना (4) ग्रामीण रोजगार हमी योजना

---

50. ग्रामीण भागाच्या विकासात महत्त्व पूर्ण योगदान देणाऱ्या ''पंतप्रधान ग्रामसडक योजना '' स केंद्र सरकार कडून ____________ % अनुदान मिळते.

(1) 80% (2) 100% (3) 90% (4) 50%

---

SPACE FOR ROUGH WORK



Teachingninja.in

51. बिहारमधील 'मुसाहर' नांवाच्या दलित–अस्पृश्य समाजाच्या सामाजिक–आर्थिक विकासासाठी बिहार सरकारने खालीलपैकी कोणत्या प्रकल्पास मान्यता दिली आहे ?

(1) उंदीरांची शेती करणे, उंदीरापासून मांस निर्माण करणे व मांसाची विक्री करण्याचा प्रकल्प

(2) उंदीरे मारून त्यापासून मांसाची छोट्या दुकानातून विक्री

(3) उंदीराचे मांस परदेशात पाठवण्याचा प्रकल्प

(4) वरीलपैकी एकही नाही

52. मागासवर्गीय सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या प्रकल्प पूर्तीसाठी कोण अनुदान देते ?

(1) सामाजिक न्याय विभाग (2) गृहनिर्माण विभाग

(3) नागरी विकास विभाग (4) महिला व बालकल्याण विभाग

53. मराठवाड्यात खुले कारागृह कुठे आहे ?

(1) औरंगाबाद (2) पैठण (3) लातुर (4) नांदेड

54. महाराष्ट्रात कौटुंबिक न्यायालयाची स्थापना कोणत्या वर्षी झाली ?

(1) 1971 (2) 1976 (3) 1989 (4) 1994

55. कल्याणकारी राज्याची ठळक कार्य कोणती ?

(1) सर्व घटक राज्यांना समान संधि

(2) सामाजिक विमा, साहाय्य, शिक्षण आणि आरोग्य

(3) अनुसूचित जन–जातींचा विचार

(4) समाजकार्याचा विकास

56. मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या पालकाचे उत्पन्न जास्त असेल अशा विद्यार्थ्यास

(1) फक्त शैक्षणिक शुल्कात सवलत मिळते

(2) फक्त शिष्यवृत्ती देण्यात येते

(3) दोन्हीही सवलती मिळतात

(4) वरीलपैकी कोणतेही उत्तर बरोबर नाही

**SPACE FOR ROUGH WORK**



Teachingninja.in

57. 'नेहरु युवा केंद्र' ला वित्तीय साहाय्यता कोण प्रदान करते ?

(1) जिल्हा परिषद

(2) जिल्हा अधिकारी कार्यालय

(3) महाराष्ट्र सरकार

(4) केंद्र सरकार

---

58. सामाजिक धोरण (सोशल पॉलिसी) म्हणजे

(1) सामाजिक विकासाचा आराखडा

(2) विविध सहकारी धोरण

(3) समाज विकासासाठी असलेल्या आर्थिक तरतूदींचा आराखडा

(4) समाज विकासाची उद्दिष्टे, साध्य व साधन याबाबतचे धोरण

---

59. केंद्रीय समाज कल्याण मंडळाचे कार्य

(1) महिला व बालकल्याणासाठी कार्य करणाऱ्या गैरसरकारी संस्थांना प्रेरणा देणे

(2) महिला संघटनांना नियमित करणे (रेग्युलेट)

(3) सरकारी व गैरसरकारी संघटनांमध्ये शृंखला वाढवणे

(4) राज्य आणि केंद्र सरकारच्या समाजकल्याण खात्यांमध्ये दुवा साधणे

---

60. महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय विभागाचा जिल्हा पातळीवरील प्रमुख अधिकारी कोण ?

(1) समाजकल्याण निरीक्षक

(2) जिल्हा समाजकल्याण अधिकारी

(3) समाजकल्याण अधिकारी वर्ग – 2

(4) विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी वर्ग – 1

---

61. केंद्रीय समाजकल्याण मंडळाच्या पहिल्या अध्यक्षा कोण होत्या ?

(1) दुर्गाबाई भागवत (2) विजयालक्ष्मी पंडित

(3) दुर्गाबाई देशमुख (4) वत्सला देशमुख

---

SPACE FOR ROUGH WORK



Teachingninja.in

62. महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय विभागाचे संचालनालय कुठे आहे ?

(1) मुंबई (2) पुणे

(3) औरंगाबाद (4) नाशिक

63. 'ट्रायसेम' या कल्याण कार्यक्रमाचे मराठीत पूर्ण रूप सांगा.

(1) ग्रामीण युवकांसाठी प्रशिक्षण

(2) ग्रामीण युवक कल्याण कार्यक्रम

(3) ग्रामीण युवकांसाठी स्वयंरोजगाराबाबत प्रशिक्षण

(4) ग्रामीण युवक विकास कार्यक्रम

64. कायद्याद्वारे महिलांचे सशक्तीकरण, आर्थिक कार्यक्रमाद्वारे सबलीकरण, शिक्षण, साक्षरता आणि आरोग्य ही उद्दिष्टे समोर ठेवून शासनाने महिला धोरणाचा नवीन आराखडा कोणत्या साली तयार केला ?

(1) 1994 (2) 1998 (3) 2000 (4) 2003

65. राष्ट्रीय महिला आयोग कधी स्थापन झाला ?

(1) 1993 (2) 1990 (3) 1994 (4) 1985

66. स्वत:ला ओळखण्याकरिता, स्वत:त सुधारणा घडविण्यासाठी व स्वत:चे व्यक्तित्त्व विकसित करण्यासाठी व्यक्तीने समाजाकडे पाहावे. सि. एच. कुलेच्या या सिद्धातांचे नांव काय ?

(1) सोशल फॅक्टर सिद्धांत (2) लुकिंग ग्लास सेल्फ सिद्धांत

(3) कोड ऑफ एथिक्स (4) बिहेविअर सिद्धांत

67. समाजशास्त्र सामाजिक समस्यांचे ____________ करते.

(1) नोंद (2) विश्लेषण (3) निराकरण (4) उपाय

68. समाजशास्त्र समाजकार्यकर्त्याला ज्ञानाची बैठक देते तर समाजकार्य ज्ञानाचा प्रत्यक्ष वापर करून समस्यांचे ________ शोधते.

(1) कारणे (2) समाधान (3) जाळे (4) परिणाम

69. भारत हा _________ देश आहे.

(1) विकसित (2) अविकसित (3) विकसनशील (4) अविकसनशील

SPACE FOR ROUGH WORK



Teachingninja.in

70. जागतिकीकरणाचा __________ हा आत्मा आहे.

(1) कुटीर उद्योग (2) खाजगीकरण (3) औद्योगिकरण (4) शिक्षणाचे सार्वत्रिकरण

71. "भारताची अर्थव्यवस्था मोठी असली तरीही गेल्या 20 वर्षात तिच्या झालेल्या वाढीचा फायदा भारतातील केवळ 23% लोकसंख्येलाच झाला. उर्वरीत 77% जनतेकडे या अर्थव्यवस्थेचे दुर्लक्षच झाले" असे कोणी म्हटले आहे ?

(1) अमर्त्यसेन (2) डॉ. भालचंद्र मुणगेकर

(3) पी. चिदंबरम (4) अर्जुनसेन गुप्ता

72. राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेनुसार कामाची मागणी करणाऱ्या व्यक्तीस 15 दिवसात काम न दिल्यास अशा व्यक्तीस

(1) 15 दिवसांचे धान्य दिले जाते (2) बेकार भत्ता दिला जातो

(3) स्वयंरोजगारासाठी साहाय्य दिले जाते (4) खाजगी काम शोधून दिले जाते

73. शेतकऱ्यांच्या सर्वात जास्त आत्महत्या कोणत्या जिल्ह्यात झाल्या ?

(1) भंडारा (2) सोलापुर (3) यवतमाळ (4) गडचिरोली

74. भारतात 2001 साली झालेल्या जनगणनेनुसार सर्वात जास्त व सर्वात कमी लोकसंख्या असणारे राज्य व केंद्रशासित प्रदेश म्हणजे

(1) मध्यप्रदेश (सर्वात जास्त), लक्षद्वीप (सर्वात कमी)

(2) उत्तरप्रदेश (सर्वात जास्त), अंदमान (सर्वात कमी)

(3) बिहार (सर्वात जास्त), गोवा (सर्वात कमी)

(4) उत्तरप्रदेश (सर्वात जास्त), लक्षद्वीप (सर्वात कमी)

75. भारतात केरळ हे राज्य साक्षरतेमध्ये पहिला क्रमांक असणारे राज्य आहे. त्याखालोखाला दुसऱ्या क्रमांकाचे राज्य म्हणजे

(1) गोवा (2) मिझोराम (3) लक्षद्वीप (4) बिहार

76. 'हिवरे बाजार' या आदर्श गावाशी संबंधित असणारी व्यक्ती कोणती ?

(1) अण्णा हजारे (2) बाबा आढाव (3) मेधाताई पाटकर (4) पोपटराव पवार

SPACE FOR ROUGH WORK



Teachingninja.in

77. पुढील विधाने वाचून गाळलेल्या जागेसाठी योग्य पर्याय निवडा.

"जो जन्मदाता असेल किंवा पालक असेल त्याने, आपल्या अपत्यास अथवा पाल्यास त्याच्या, वयाच्या सहाव्या वर्षापासून तो चौदाव्या वर्षापर्यंत शिक्षणाची संधि उपलब्ध करून द्यावी."

हे विधान भारतीय संविधानानुसार __________ आहे.

(1) कायदा (2) मूलभूत कर्तव्य (3) मूलभूत हक्क (4) मूलभूत गरज

78. सातारा जिल्ह्यातून चिपळूणला जाण्यासाठी __________ घाट उतरावा लागतो.

(1) अंबा (2) कुंभार्ली (3) फोंडा (4) थळ

79. संत साहित्याची सामाजिक आणि राष्ट्रीय कामगिरी आपल्या ग्रंथांमधून मांडणारे थोर पुरोगामी विचारवंत म्हणजे __________ हे होत.

(1) तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी (2) गं. बा. सरदार

(3) ना. ग. गोरे (4) भाई माधवराव बागल

80. पुढीलपैकी कोणता घटक ही भारताची ओळख नाही ?

(1) मोर (2) कमळ (3) आंबा (4) हरीण

81. खालीलपैकी प्रत्यक्ष कर कोणता आहे ?

(1) अबकारी कर (2) विक्री कर (3) आयकर (4) वरीलपैकी सर्व

82. महाराष्ट्रात कवी कुलगुरु कालिदास संस्कृत विद्यापीठ कोठे आहे ?

(1) पैठण (2) वर्धा (3) रामटेक (4) नांदेड

83. खालील पर्यायातील __________ ही नदी पूर्ववाहिनी नदी नाही.

(1) महानदी (2) कावेरी (3) कृष्णा (4) साबरमती

84. 'ड्रीम्स् फ्रॉम माय फादर' या पुस्तकाचे लेखक कोण ?

(1) बेन्झीर भुट्टो (2) हेलन केलर (3) स्टीफन हॉकिंग (4) बराक ओबामा

**SPACE FOR ROUGH WORK**



Teachingninja.in

85. विधांन पूर्ण करण्यासाठी योग्य पर्याय निवडा.

कोकणात भरपूर पाऊस पडूनही तेथे पाणीटंचाई असते कारण ________

(1) तेथील नद्यांना तीव्र उतार आहे (2) तेथील नद्यांची लांबी कमी आहे

(3) तेथील नद्यांची संख्या कमी आहे (4) वरील सर्व कारणे योग्य आहेत

86. खालीलपैकी ________ या घटनादुरुस्तीचे एक ठळक वैशिष्ट्ये म्हणजे महापौर व नगराध्यक्षांचे पद आळीपाळीने महिलांसाठी राखून ठेवण्यात आले.

(1) 43 व 45 (2) 73 व 74 (3) 27 व 33 (4) 15 व 27

87. एखाद्या पदार्थाचे तापमान 100°C आहे , तर त्या पदार्थाचे केलव्हिन मापनश्रेणीमध्ये तापमान ________ असते.

(1) 173 K (2) 100 K (3) 373 K (4) 273 K

88. वनसंवर्धनातील समस्यांना वाचा फोडण्यासाठीच्या चिपको आंदोलनाचे प्रणेते ________ होत.

(1) सुंदरलाल बहुगुणा (2) मोहन धारिया (3) अण्णा हजारे (4) विनोबा भावे

89. अन्नपूर्णा योजनेबाबतची माहिती ________ पुरविते.

(1) जिल्हा परिषद (2) ग्रामपंचायत (3) राज्यसरकार (4) केंद्रसरकार

90. एल. पी. जी. मध्ये ________ हे घटक असतात.

(1) ब्युटेन आणि आयसोब्युटेन (2) मिथेन आणि ब्युटेन

(3) मिथेन आणि इथेन (4) इथेन आणि ब्युटेन

91. अकराव्या पंचवार्षिक योजनेचे उपाध्यक्ष ________ हे आहेत.

(1) डॉ. मनमोहनसिंग (2) मोहन धारिया

(3) पी. चिदंबरम (4) माँटेकसिंग अहलुवालिया

92. 'बँक दर' म्हणजे असा दर की ज्या दराने रिझर्व्ह बँक ________ कर्ज देते.

(1) व्यापारी बँकाना (2) विदेशी बँकाना

(3) केंद्रशासनाला (4) नाबार्डला

SPACE FOR ROUGH WORK



Teachingninja.in

93. भाभा अणुऊर्जा केंद्राने कोणत्या ठिकाणी कृषी उत्पादन संरक्षण केंद्राची स्थापना केली आहे ?

(1) माणगाव (2) लासलगाव
(3) कुळगाव (4) नांदगाव

94. महाराष्ट्रातील आरोग्य विज्ञान विद्यापीठ ________ येथे आहे.

(1) नागपुर (2) लोणेरे
(3) अमरावती (4) नाशिक

95. नाफेड (NAFED) खालीलपैकी कशाशी संबंधित आहे ?

(1) शेतीमाल विक्री (2) पशुसंवर्धन (3) शेती सुधारणा (4) कुटिरोद्योगांना उत्तेजन

96. देशातील शालेय आणि उच्चशिक्षणाचे प्रशासन हे कोणत्या मंत्रालयाच्या अखत्यारीत येते ?

(1) मानव संसाधन विकास मंत्रालय (2) सूचना (माहिती) आणि प्रसारण मंत्रालय
(3) महिला आणि बालविकास मंत्रालय (4) युवक कार्यक्रम आणि खेळ मंत्रालय

97. जवाहर नवोदय विद्यालयांचा पुढीलपैकी कोणता हेतु नाही ?

(1) ग्रामीण भागातील प्रज्ञावान मुलांना शिक्षणाच्या उत्तम संधि देणे
(2) फक्त मुलींना उत्तम शिक्षणाची संधि उपलब्ध करणे
(3) विद्यार्थ्यांना देशाच्या सांस्कृतिक वैविध्याचा प्रत्यक्ष अनुभवातून परिचय करून देणे
(4) विद्यार्थ्यांना सहशिक्षणाची निवासी सोय उपलब्ध करणे

98. नागरी लोकसंख्येच्या प्रमाणाच्या बाबतीत भारतातील प्रमुख राज्यामध्ये महाराष्ट्राचा ________ क्रमांक लागतो.

(1) पहिला (2) दुसरा (3) तिसरा (4) पाचवा

99. पुढीलपैकी कोणते प्रदेश 'राज्य' या दर्जाचे नाहीत ?

(1) मिझोराम (2) पडुचेरी (पाँडिचेरी)
(3) त्रिपुरा (4) झारखंड

SPACE FOR ROUGH WORK



Teachingninja.in

100. पुढीलपैकी कोणते ध्येय सर्व शिक्षा अभियानात समाविष्ट नाही ?

(1) सहा–चौदा वयोगटातील मुलांना प्राथमिक शिक्षणाची हमी देणे

(2) सहा–चौदा वयोगटातील मुलांना पुढे उच्च शिक्षणाची हमी देणे

(3) प्राथमिक स्तरावर लिंग व सामाजिक भेद नाहीसा करणे

(4) प्राथमिक स्तरावर दर्जेदार जीवनशिक्षणावर भर देणे

---

101. खालील संख्यामालेतील प्रश्नचिन्हाच्या जागी काय येईल ?

24, 35, 48, 63, ?

(1) 80 (2) 82 (3) 72 (4) 90

---

102. प्रश्नचिन्हाच्या जागी योग्य पर्याय निवडा.

BTSD : ? :: JPOL : NNMP

(1) EQRG (2) FQRG (3) ERQG (4) FRQH

---

103. एका लंबकाच्या घड्याळाचे दर तासाला तासांच्या संख्येप्रमाणे व दर अर्ध्या तासाला एक याप्रमाणे टोले वाजतात. तर त्या घड्याळाचे सव्वा बारा वाजल्यापासून सव्वापाच पर्यंत एकूण किती टोले वाजतील ?

(1) 20 (2) 15 (3) 19 (4) 21


---

104. कविताचा जन्म 5 नोव्हेंबर रोजी झाला. अनिता ही कवितापेक्षा 15 दिवसांनी मोठी आहे. त्या वर्षी बालदिन शुक्रवारी आलेला होता. तर अनिताचा जन्म कोणत्या वारी झाला ?

(1) मंगळवार (2) बुधवार (3) गुरुवार (4) शुक्रवार

---

105. प्रश्नचिन्हाच्या जागी कोणती संख्या येईल ?




(1) 6 (2) 120 (3) 10 (4) 12

---

SPACE FOR ROUGH WORK



Teachingninja.in

106. एका रांगेत काही मुले उभी आहेत. (क्ष) म्हणतो 'माझा शेवटून सातवा क्रमांक आहे.' (य) म्हणतो 'माझा सुरुवातीपासून बारावा क्रमांक असून क्ष हा माझ्या आधी एक स्थान वगळून उभा आहे.' तर रांगेत एकूण किती मुले उभी आहेत ?

(1) 19 (2) 17 (3) 16 (4) 15

107. एका सांकेतिक भाषेत 1, 2, 3, 4, 5 या अंकांऐवजी □, ○, Δ, ∨, ● ही चिन्हे वापरली आहेत. परंतु अंकक्रमाने अक्षरे दिलेली नाहीत.

जर Δ गुणिले ∨ = 5

□ गुणिले □ = 4

○ वजा ∨ = 2

○ गुणिले ● = 12


यावरून Δ गुणिले ● = ?

(1) 20 (2) 15 (3) 10 (4) 5

108. स्वयंपाक्याला व्यवस्थापक म्हटले, व्यवस्थापकाला शिक्षक म्हटले, शिक्षकाला कारकून म्हटले, कारकुनाला पोलीस म्हटले तर वर्गात कोण शिकवितो ?

(1) स्वयंपाकी (2) शिक्षक (3) कारकून (4) पोलीस

109. खालील आकृतीतील त्रिकोणांची संख्या लिहा.



(1) 13 (2) 17 (3) 14 (4) 16

110. एका मैदानावर 11 स्पर्धक उपस्थित आहेत. प्रत्येक स्पर्धक राहिलेल्या प्रत्येक खेळाडूंशी फक्त एकदा हस्तांदोलन करतो. तर एकूण किती हस्तांदोलने होतील ?


(1) 110 (2) 121 (3) 61 (4) 55





**SPACE FOR ROUGH WORK**




Teachingninja.in

111. पुढे दिलेल्या आकृत्यांचे निरीक्षण करून प्रश्नचिन्हा जागी येणारी आकृति शोधा.



(1)  (2)  (3)  (4) 

112. प्रश्नचिन्हाचे जागी कोणती संख्या हवी ?




(1) 10 (2) 24 (3) 30 (4) 40

113. शशांक स्वत:च्या घरून निघून शाळेत जाताना प्रथम पूर्वेकडे सरळ 100 मी. जातो. त्याच स्थितीत तो एकदा काटकोनात उजवीकडे वळून 50 मी. जातो. नंतर तो एकदा काटकोनात डावीकडे वळून सरळ 100 मी. चालल्यावर शाळेत पोहचतो. तर शशांकचे घर शाळेच्या कोणत्या दिशेला आहे ?

(1) आग्नेय (2) ईशान्य (3) वायव्य (4) नैऋत्य

114. खालील चौकोनांत प्रश्नचिन्हांच्या जागी कोणती संख्या येईल ?

| | | |
|---|---|---|
| 4 | 8 | 12 |
| 3 | 4 | 5 |
| 1 | 16 | ? |


(1) 49 (2) 30 (3) 17 (4) 4

SPACE FOR ROUGH WORK



Teachingninja.in

115. प्रश्नचिन्हासाठी योग्य पर्याय निवडा.





(1) 52 (2) 54 (3) 48 (4) 65

116. एका कुटुंबातील 5 जणांच्या आजच्या वयांची बेरीज 89 वर्षे आहे. त्यातील दोन जणांची आजची वये अनुक्रमे 12 व 5 वर्षे आहे. तर 9 वर्षांपूर्वी त्या सर्वांच्या वयांची बेरीज किती असेल ?

(1) 44 (2) 48 (3) 53 (4) 58

117. प्रश्नचिन्हासाठी योग्य पर्याय निवडा.




(1) प (2) ध (3) फ (4) न

118. एका सांकेतिक भाषेत TAJMAHAL हा शब्द UBKNBIBM असा लिहिला तर LALKILA हा शब्द कसा लिहिला जाईल ?

(1) MBMLKMB (2) MBMLGKM (3) UBKJHKZ (4) MBMLJMB

119. प्रश्नचिन्हासाठी योग्य पर्याय निवडा.

122 : 170 :: 290 : ?


(1) 364 (2) 362 (3) 352 (4) 324


SPACE FOR ROUGH WORK





Teachingninja.in


120. गटांतील वेगळी आकृति कोणती ?



(1) 

(2) 

(3) 

(4) 

121. कोणती संख्या दिलेल्या मालिकेचा घटक नाही ?

64, 32, 16, 8, 4, 2, 0

(1) 2 (2) 4 (3) 64 (4) 0

122. रिकाम्या जागी भरावयाच्या अक्षरांचा योग्य क्रमाने असलेल गट निवडा.


– baba – a – a – ab


(1) baba (2) baab (3) abbb (4) abaa


123. '$JP_2$' चा '$IQ_7$' शी जसा संबंध आहे तसा '$UE_{10}$' चा खालीलपैकी कोणाशी आहे ?


(1) $DV_4$ (2) $VC_6$ (3) $VD_3$ (4) $WD_8$


124. पुढील आकृत्यांचे निरीक्षण करून प्रश्नचिन्हाजागी येणारी आकृति शोधा.



(1) 

(2) 

(3) 

(4) 

SPACE FOR ROUGH WORK



teachingninja.in
Teachingninja.in

125. लांबी 16 मीटर व रुंदी 8 मीटर असलेल्या एका आयताकृती बागेभोवती 2 मीटर रुंदीचा रस्ता आहे. तर त्या रस्त्याचे क्षेत्रफळ किती ?

(1) 128 चौरस मीटर (2) 52 चौरस मीटर

(3) 16 चौरस मीटर (4) 112 चौरस मीटर

---

126. जर RST म्हणजे 78, 79, 80 तर ZXW म्हणजे काय ?

(1) 86, 84, 83 (2) 81, 82, 83 (3) 81, 80, 82 (4) 85, 84, 83

---

127. प्रश्नचिन्हाजागी योग्य पर्याय निवडून लिहा.

BZC : EWF :: FUG : ?

(1) JRI (2) IRJ (3) HRI (4) IRH

---

128. 4B8 आणि 8C24 असेल आणि 9E45 तर 17 H ... किती ?

(1) 51 (2) 21 (3) 136 (4) 85

---

129. संख्यामलिकेतील शेवटच्या दोन संख्या कोणत्या ?

896, 729, 448, 243, 224, 81, ?, ?

(1) (112, 27) (2) (122, 29) (3) (27, 112) (4) (112, 9)

---

130. एका सांकेतिक भाषेत HIJKLMN + − × ÷ < > = असे लिहिले जाते तर या भाषेत SUITABLE कसे लिहिले जाईल ?

(1) < = > − + < < − (2) < = − > + − < <

(3) > = − < + − < < (4) > = − > + − = <

---

131. गटात न बसणारी संख्या कोणती ?

48, 63, 80, 27, 35, 8, 3.


(1) 3 (2) 80 (3) 35 (4) 27

---



Teachingninja.in

132.




सोबतच्या आकृतीत शिक्षकांचे तीन गट दाखविलेले आहेत. भाषा विषय शिक्षक 'आयता' त गणित विषय शिक्षक 'त्रिकोणा' त इतिहास विषय शिक्षक 'वर्तुळा' त दाखविले आहेत. निरानिराळ्या भागात लिहिलेली संख्या शिक्षकांची संख्या आहे.

यावरून फक्त एकच विषय शिकविता येतो असे एकूण शिक्षक किती ?

(1) 67 (2) 21 (3) 46 (4) 52

---

133. अशोक, राघवेंद्र, रमण व गोपी यांना प्रत्येकी मराठी, कन्नड, हिंदी व इंग्रजी यापैकी तीन भाषा येतात. अशोकला इंग्रजी येत नाही. राघवेंद्रला हिंदी येत नाही, रमण ला कन्नड येत नाही व गोपीला मराठी येत नाही.

यावरून ज्यांना कन्नड व हिंदी या दोन्ही भाषा येतात अशी जोडी कोणती ?

(1) अशोक, रमण (2) अशोक, गोपी (3) अशोक, राघवेंद्र (4) राघवेंद्र, गोपी

---

134. संख्यामालिकेतील चुकीची संख्या कोणती ?

101, 109, 118, 127, 136, 145

(1) 101 (2) 127 (3) 109 (4) 118

---

135. जर BOY = 31626 तर HOT = ?

(1) 91521 (2) 81626 (3) 91621 (4) 82024

---

136. खालील चौकोनांत प्रश्नचिन्हाच्या जागी कोणती संख्या येईल ?

| | | |
|---|---|---|
| 6 | 60 | 5 |
| 8 | 112 | 7 |
| 14 | ? | 12 |

(1) 182 (2) 168 (3) 252 (4) 336

---

SPACE FOR ROUGH WORK



Teachingninja.in

137. अशोकचे वय सुरेशच्या वयाच्या दुप्पटीपेक्षा पाच वर्षांनी कमी आहे व अजयच्या वयाच्या $\frac{1}{3}$ पेक्षा आठ वर्षांनी जास्त आहे. सुरेशचे वय दहा वर्षे असल्यास अजयचे वय किती ?

(1) 21 वर्षे (2) 23 वर्षे (3) 15 वर्षे (4) 28 वर्षे

---

138. 800 मी. लांबीची रेल्वेगाडी एक विजेचा खांब 48 सेकंदात ओलांडून जाते, तर तिचा ताशी वेग किती ?

(1) 50 कि.मी. (2) 40 कि.मी. (3) 65 कि.मी. (4) 60 कि.मी.

---

139. जर CLOCK = 44, TIME = 47 तर WATCH = ?

(1) 45 (2) 52 (3) 55 (4) 50

---

140. चौथे पद कोणते ?

लेफ्टनंट : कॅप्टन :: कर्नल : ?

(1) मेजर (2) ब्रिगेडिअर (3) कमांडर (4) जनरल

---

141. प्रत्येकाला चार याप्रमाणे पेरू वाटल्यास एका टोपलीत एक पेरू शिल्लक राहतो. तेच पेरू प्रत्येकाला तीन याप्रमाणे वाटल्यास बारा पेरू बाकी उरतात. तर त्या टोपलीत एकूण किती पेरू आहेत ?

(1) 55 (2) 21 (3) 45 (4) 51

---

142. चौथे पद कोणते ?

23 : 57 :: 1113 : ?

(1) 1315 (2) 1517 (3) 1719 (4) 1921

---

143. प्रकाशने आर्थिक व्यवहार सुरक्षेसाठी 1 ते 9 अंकांकरिता MARKETING या शब्दातील अक्षरांचा वापर केला. यानुसार त्याने 413 रुपये 25 पैसे ही किंमत कशी लिहायला हवी ?

(1) KMR/EA (2) RKT/AE (3) KRM/KE (4) KMR/AE

---

144. क्रमाने येणारी संख्या कोणती ?

15, 35, 63, 99, 143, ?

(1) 169 (2) 195 (3) 168 (4) 196

---

SPACE FOR ROUGH WORK



Teachingninja.in

145. खालील गटातील विसंगत प्राणी ओळखा. वटवाघूळ, मांजर, सरडा, माकड

(1) वटवाघूळ (2) मांजर (3) सरडा (4) माकड

146. प्रश्नचिन्हाजागी कोणती संख्या येईल ?

17 : 289 : : 19 : ?

(1) 273 (2) 361 (3) 372 (4) 171

147. प्रश्न चिन्हाच्या जागी अंक भरा.

8, 24, 12, 36, 18, 54, ?, 81

(1) 09 (2) 29 (3) 26 (4) 27

148. सोबतचे वजाबाकीचे उदाहरण पाहून त्यावरून खालील प्रश्नाचे उत्तर द्या.

```
   L   A   M
 – A   M   P
 ___________
   2   2   2
```

तर LAMP या शब्दाबद्दल कोणती संख्या असू शकेल ?



(1) 9753 (2) 8642 (3) 7531 (4) सर्व बरोबर





149. प्रश्नचिन्हाजागी योग्य पर्याय निवडून लिहा.

$\frac{Z}{18}, \frac{Y}{20}, \frac{W}{23}, \frac{T}{27}, ?$

(1) $\frac{S}{31}$ (2) $\frac{S}{32}$ (3) $\frac{P}{31}$ (4) $\frac{P}{32}$

150. चौथी आकृति कोणती ?

 :  : :  : ?

(1)  (2)  (3)  (4) 

SPACE FOR ROUGH WORK



Teachingninja.in

कच्च्या कामासाठी जागा/SPACE FOR ROUGH WORK



Teachingninja.in